


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख २ फेब्रुवारी, १९४९ अंक ५

## दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ३०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ३५,००,००० |

—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना—१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | "Cencobank" | नं. ५११ |

मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर







तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स बुधवार चौक, पुणें

# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठीं आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**हस्तिदंताची निर्यात**—हिंदुस्थानची निर्यात वाढविण्यासाठीं हिंदुस्थान सरकार सध्या विचार करीत आहे. हिंदुस्थानांतून अमेरिका आणि कानडा ह्या देशांत हस्तिदंताच्या वस्तूंची निर्यात करण्यास कितपत वाव आहे, ह्यासंबंधी सरकारनें पूसतपास केली असतां असें आढळून आलें कीं, हस्तिदंताच्या वस्तूंना वरील देशांतून उपलब्ध असलेली बाजारपेठ मर्यादितच आहे. त्यामुळें सध्या त्यांच्या निर्यातींत वाढ करण्यास फारसा वाव नाहीं. त्याचीं दोन कारणें आहेत. एकतर हस्तिदंतावर कोरलेलीं चित्रें पौराणिक विषयांचीं अगर अमेरिकनांच्या आवडीनिवडीला न पटणाऱ्या प्राण्यांचीं असतात; आणि शिवाय त्यांच्या कलाकुसरीला सफाईदारपणा नसतो.

**माकडांचा विमानांतून प्रवास**—न्यूयॉर्क आणि जॉर्जिआ ह्या अमेरिकेंतील संस्थानांच्या संशोधन-शाळांनीं हिंदुस्थानांतून १०,००० माकडें मागविलीं होतीं. त्यांपैकी पहिलीं शंभर माकडें नुकतीच विमानानें रवाना झालीं. इन्फंटाइल पॅरॅलिसिस ह्या रोगासंबंधी त्यांच्यावर प्रयोग करण्यांत येणार आहेत. माकडांशिवाय दोन चित्ते आणि बऱ्याच जातीचे पक्षीहि पशुसंग्रहालयासाठीं माकडांबरोबर रवाना करण्यांत आले आहेत.

**प्रिव्ही कौन्सिल हिंदुस्थानांत काम करणार?**—"सध्या प्रिव्ही कौन्सिलपुढें असलेलीं अपिलें लंडनला न चालतां त्यांचें कामकाज हिंदुस्थानांतच चालण्याची शक्यता आहे, असें समजतें. त्या कामासाठीं लंडनहून दोन न्यायाधीश हिंदुस्थानांत पाठविण्याची कौन्सिलची तयारी आहे. सध्या हिंदुस्थानांत प्रिव्ही कौन्सिलचे दोन न्यायाधीश आहेतच. आणखी एक न्यायाधीश हिंदुस्थानांतच नेमला कीं पांच न्यायाधीशांचें एक मंडळ तयार होईल. हें मंडळ ऑक्टोबर १९४९ पासून १९५० च्या ईस्टरपर्यंत सर्व अपिलें निकालांत काढूं शकेल, असा अंदाज आहे. सध्या प्रिव्ही कौन्सिलपुढें १८७ अपिलें आहेत." हिंदुस्थानांत प्रसृत झालेली ही बातमी चुकीची आहे, असें लंडनचें वृत्त आहे.

**पाकिस्तानला चलनी जिंदगीची रवानगी**—पाकिस्तानच्या सरकारी बँकेला हिंदुस्थानच्या रिझर्व्ह बँकेनें आतांपर्यंत पुढील प्रमाणें चलनी जिंदगी वर्ग केली आहे. पाकिस्तानमध्यें सध्या चालू असलेल्या नोटांना तारण म्हणून पाकिस्तानचा हा वांटा पाठविण्यांत आला आहे. रिझर्व्ह बँकेनें पाठविलेली जिंदगी पुढीलप्रमाणें आहे. २ कोटी रुपये किंमतीचें सोनें (प्रत्येक तोळ्याची कायदेशीर किंमत २३-३-१० अशी आहे.) ह्याशिवाय ६० कोटी रुपयांचे पौंडी रोखे, २४ कोटी रुपयांचे हिंदी रुपयाचे रोखे आणि ३ कोटी रुपयांचीं नाणीं.

**मॅनेजर पाहिजे**—सांगली बँक लि. नें मॅनेजरच्या जागेसाठीं अर्ज मागविले आहेत. पगाराची श्रेणी ३५०-७०० रु. आहे.

**गांधीनगर वसाहत**—चंबळ नदीवर होणाऱ्या धरणाजवळ भानपुरा ह्या ग्वाल्हेर संस्थानांतील गांवाजवळ गांधीनगर वसाहतीचा कोनशिलासमारंभ नुकताच करण्यांत आला. मध्यभारत संघाचे मुख्यप्रधान, पं. लीलाधर जोशी, ह्यांनीं समारंभाचें अध्यक्षपद स्वीकारलें होतें.

**नवीन इतिहास-संशोधक संस्था**—ओरिसाच्या सरकारनें कलिंग इतिहास संशोधन-संस्था नांवाची एक संस्था स्थापन केली आहे. ओरिसाच्या इतिहासाचें संशोधन करणें, पुरातन इमारतींचा व वस्तूंचा शोध करणें आणि प्रांतांतील पुराणवस्तु संग्रहालयांची वाढ करणें, असे संस्थेचे उद्देश आहेत. ओरिसाचे मुख्यप्रधान श्री. हरेकृष्ण मेहताब हे संस्थेचे अध्यक्ष आहेत.

**नवीन विमान वहातुकीचा परवाना**—हिंदुस्थानांतून चीनशीं विमानवहातूक करण्याचा परवाना हिंदुस्थान सरकारनें नुकताच एका कंपनीला दिला असें समजतें. या परवान्यांतच पुढें जपानचाहि समावेश करण्यांत येणार आहे. दुसऱ्या एका कंपनीला ऑस्ट्रेलिआच्या विमान वहातुकीचा परवाना देण्यांत आला आहे. ह्याशिवाय हिंदुस्थान-इराण विमान वहातुकीचा परवाना मागणारा एक अर्ज सरकारकडे आला आहे.


# NOTICE.

**THE BANK OF MAHARASHTRA, LTD.**

Notice is hereby given that the Fourteenth Ordinary General Meeting of the Share-holders of the Bank of Maharashtra, Ltd. will be held at the Registered Office of the Bank, Kakakuva Mansion, Laxmi Road, Poona City, on Sunday the 27th Day of February, 1949 at 4 P. M. (S. T.) to transact the following business:—

(1) To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account and the Reports of the Directors and of the Auditors for the year ended 31st December, 1948.

*(2) To declare Dividend.

(3) To elect three Directors in the places of the retiring Directors who are eligible for re-election.

(4) To appoint Auditors and to fix their remuneration.

(5) To transact such other business as may be allowed by the Chairman.

By order of the Board,

Poona City, 27th January, 1949 — C. V. Joag, Manager.

*N. B.*:-The Share Transfer Books of the Bank will be closed from the 24th day of February, 1949 to the 4th day of March, 1949, both days inclusive.

*The Dividend, when declared, will be payable on and after Friday, the 25th Day of March, 1949 and Dividend Warrants will be posted to the Registered Addresses of the Share-holders. *Change of address, if any, should immediately be communicated to the Bank.*

# अर्थ

बुधवार, ता. २ फेब्रुवारी, १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## सरकारी खर्चांत काटकसर

सरकारी खर्चांत काटकसर करण्याकडे हल्ली अधिकाऱ्यांचें लक्ष आहे. श्री. कस्तुरभाई लालभाई ह्यांच्या अध्यक्षत्वाखालीं नेमलेली काटकसर सुचविणारी कमिटी निरनिराळ्या खात्यांची छाननी करून खर्च कमी करण्याचे मार्ग सुचवीत आहे. पुनर्घटनेच्या योजनांवर ३३⅓ टक्के कपात केली असतां सुमारें ३५ कोटींची बचत एका वर्षांत होईल. ह्या प्रसंगीं, हिंद हा जगांतील एक सर्वांत गरीब देश आहे व सरकारी खर्चांत काटकसर केल्याशिवाये यापुढें तरणोपाय नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. केवळ सरकारी खर्च हा कांहीं जनतेची सर्वांगीण उन्नति करूं शकत नाहीं हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. जनतेची सर्वसाधारण परिस्थिति एकंदर सरकारी खर्चावर अवलंबून नसून देशांतील विविध प्रकारच्या उत्पादनावरच अवलंबून आहे. असें असल्यामुळें, संपत्तीचें प्रत्यक्ष उत्पादन निश्चित-पणें कसें व किती प्रमाणांत वाढेल ह्या मुख्य गोष्टीवरच भर दिला गेला पाहिजे. भांडवल संचय होणें, तें भांडवल उद्योगधंद्यांत गुंतविलें जाणें व उत्पादनशक्ति वाढविणें ह्या त्रयींना अनुकूल वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी सरकारी धोरणावर येऊन पडते. हिंदचें एकंदर उत्पादन समाधानकारकपणें वाढत नाहीं व भांडवल उद्योगधंद्यांत गुंतविलें जाण्याचें प्रमाण जवळ जवळ नष्ट होत चाललें आहे. अशा परिस्थितींत एकंदर संपत्तीचें उत्पादन प्रथम कसें वाढेल ह्या एकाच गोष्टीवर सरकारी धोरणाचा भर असणें योग्य ठरेल. सर स्टॅफोर्ड क्रिप्स ह्यांनीं ब्रिटनच्या बजेटबद्दल जसें व्यावहारिक धोरण ठेवलें व ज्यामुळें शेती माल व कारखानी माल ह्यांचें उत्पादन गेल्या २ वर्षांत प्रत्यक्ष वाढलें त्याच स्वरूपाचें धोरण यापुढें हिंद सरकारनें ठेवणें इष्ट दिसतें.

काश्मीर आघाडीवरील युद्ध—तहकुबीमुळें यापुढें लष्करी खर्चांत काटकसर साधणें शक्य दिसतें. अन्नाच्या आयातीवर वार्षिक १०० कोटींहूनहि जास्त रुपये खर्चावे लागतात, ह्यासाठी अन्नमंत्री श्री. जयराम दौलतराम ह्यांनीं नुकत्याच जाहीर केलेल्या योजनांप्रमाणें अन्नाचें उत्पादन सत्वर कसें वाढेल ह्या गोष्टीकडे पुढील वर्षीं विशेष भर दिला पाहिजे. रेल्वेजना जास्त इंजिनें व वॅगन्स ह्यांचा पुरवठा होईल, तर खर्चाचें प्रमाण अगदी अल्पांशानें वाढून रेल्वेचें माल व उतारू वहातुकीमुळें होणारें उत्पन्न कित्येक कोटी रुपयांनीं वाढेल. इतर शक्य त्या प्रकारें खर्चांत काटकसर करून शिलकीचें अंदाज-पत्रक साधण्याकडे सरकारचा दृष्टिकोन पाहिजे. कोणत्याहि प्रकारें नवीन अनुत्पादक करवाढ यापुढें करण्यांत अर्थ नाहीं. संपत्तीचें सर्वांगीण वाढतें उत्पादन, सरकारी खर्चांत काटकसर, कमी कर, व औद्योगिक भांडवल गुंतविण्याला उत्तेजन अशी परिस्थिति निर्माण झाली तर आर्थिक परिस्थिति ब्रिटनप्रमाणेंच आपल्याकडेहि अल्प प्रमाणांत तरी सुधारूं लागेल. निदान अशा परिस्थितीची सुरवात झाली पाहिजे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर विश्वास नसल्यास सहकारी तत्त्वाचा अवलंब शक्य तेथें मोठ्या प्रमाणांत झाला पाहिजे. विशेष प्रकारची चिकाटी व कार्यक्षमता दाखविल्या-शिवाय परिस्थिति सुधारणार नाहीं.

## कानडांत कम्युनिझमचा वाढता प्रसार

सर्वसाधारणपणें अशी समजूत पसरलेली आढळते कीं, कम्युनिझमचा प्रसार हा राजकीय आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांतच होतो. चीनमधील कम्युनिस्टांचा होऊं घातलेला जय ह्या समजुतीला पुष्टी देणाराच आहे. तथापि ही समजूत सर्वस्वी बरोबर नाहीं असें दिसतें. कारण, कानडासारख्या देशांतहि कम्युनिस्ट तत्वज्ञानाचा प्रसार बराच झाला असून त्या देशाच्या पार्लमेंटमध्यें राज्यद्रोहासंबंधीं असलेल्या कायद्याला अधिक बळकटी आणण्यासाठी एक नवा कायदा करण्यांत येणार आहे, असें समजतें. कानडांतील लोक एकंदरीनें सुस्थितींत असून, तेथें लोकशाही घटनेच्या अनुरोधानें राज्यकारभार चालतो हें प्रसिद्धच आहे. असें असतांना कानडांत कम्युनिझमचा प्रसार कां व्हावा हा एक प्रश्नच आहे. ह्याचें एक उत्तर असें देतां येईल कीं, कानडा देश लष्करी दृष्ट्या महत्त्वाचा असल्यानें रशिआच्या हस्तकांनीं तेथें कम्युनिझमचा प्रचार केला असावा. कानडा देश हा अमेरिकेला लागून आहे. रशिआ—अमेरिका ह्यांच्यामधील संभाव्य युद्धांत उत्तर ध्रुवावरून एकमेकांना एकमेकांवर हल्ला करणें अधिक शक्य आहे. अर्थातच, रशिआनें अगर अमेरिकेनें कानडावर डोळा ठेवावा हें लष्करी दृष्ट्या इष्ट ठरतें. कानडांतील कम्युनिझमच्या प्रसाराचें वरील कारण अगदींच दुर्लक्ष करण्यासारखें नसलें तरी तें सर्वस्वी खरें आहे असें म्हणतां येत नाहीं. कानडा देशांतील अर्थव्यवस्थाहि कम्युनिझमच्या प्रसाराला अंशतः कारणीभूत झाली असावी असें मानण्यास जागा आहे. त्या देशांतील, जंगलें, मच्छीमारीचा धंदा, बँका, विमा आणि वहातुकीचीं साधनें कांहीं थोड्या बड्या भांडवलदारांच्या मालकीचीं झालीं आहेत असें म्हणतात. देशांतील अर्थोत्पादनाचें अशा रीतीनें केंद्रीकरण झालें कीं कम्युनिझमच्या प्रसाराला अनुकूल भूमि उत्पन्न होते, असा साधारण मानानें अनुभव आहे. प्रे. ट्रुमन ह्यांनीं ८१ व्या काँग्रेसपुढें भाषण करतांना नुकताच अमेरिकेंतील अशाच प्रकारच्या केंद्रीकरणाचा उल्लेख केला होता. उत्पादक साधनांच्या केंद्रीकरणावर जनतेच्या हिताच्या दृष्टीनें नियंत्रणें बसविणें हा एकच उपाय कम्युनिझमला आळा घालण्याच्या दृष्टीनें उपयुक्त ठरण्याचा संभव आहे. कानडांतील आर्थिक परिस्थितीवरून इतर उद्योगप्रधान राष्ट्रांनाहि बोध घेण्यासारखा आहे.

---

## चेक्सची देवघेव

बॉंबे बँकर्स क्लिअरिंग हाऊसमधील १९४७ व १९४८ मधील चेक्सच्या देवघेवीचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत:—

| वर्ष | चेक्सची संख्या | रक्कम (रु.) | प्रत्येक चेकची सरासरी (रु.) |
|---|---|---|---|
| १९४७ | ८१,९७,२५६ | २४,७७,१२,१६,६९३ | ३,०२२ |
| १९४८ | ९०,०२,६३५ | २७,१२,५९,४६,६५८ | ३,०१३ |

म्हणजे, चेक्सची संख्या वाढली व एकूण रकमहि वाढली परंतु प्रत्येक चेकची सरासरी रक्कम जरा कमीच झाली.

## हें केल्याशिवाय उत्पादन वाढणार नाहीं.

### कारखानदारांच्या व देशाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न

( श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. )

उत्पादन कमी पडत आहे तें वाढवा म्हणून सगळीकडून आक्रोश चालला आहे. आपापल्या परीनें जो तो कारणें देत आहे भांडवलवाल्यांनीं मजुराकडे बोट दाखवावें, मजुरांनीं कारखानदारांच्या नफ्याकडे आणि चढत्या किंमतीकडे बोट दाखवावें व सरकारनें उपदेशक पत्रकें काढावीत अशी परिस्थिति आहे.

उत्पादनघट ही फक्त हिंदुस्थानांतच चालूं आहे असें नाहीं. ब्रिटन आणि अमेरिकेसारखा श्रीमंत देश यांच्यांतही ती चालूं आहे. ब्रिटनमधील फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीज् या संस्थेनें या दृष्टीनें ब्रिटिश अर्थसचिवाकडे आपली कैफियत सादर केली आहे. तसेंच नुकतेंच चेस नॅशनल बँक ऑफ सिटी ऑफ न्यूयॉर्क या बँकेचे अध्यक्ष श्री. आल्डरिच यांनीं अमेरिकेंतील उद्योगघटीची एका चर्चेत उत्कृष्ट मीमांसा केली आहे. या दोन्ही मतप्रणाली आपल्या जबाबदार मंत्र्यांच्या निदर्शनास आणणें जरूर आहे. त्या निदर्शनास आणण्याचें काम इकडील सुप्रसिद्ध 'कॉमर्स' या साप्ताहिकानें आपल्या २२ जानेवारीच्या अंकांत केलेलें आहे. त्याकडे मराठी वाचकांचें आणि आपल्या आर्थिक प्रगतीबद्दल आस्था बाळगणारांचें तांतडीनें लक्ष वेधणें जरूर आहे.

उत्पादनास भांडवलाची आवश्यकता आहे आणि भांडवल जमण्यास बचतीची आवश्यकता आहे हें मुद्दाम सांगण्याची जरूर नाहीं. उत्पादन न वाढतां घटत चाललें आहे याचा अर्थ असा कीं, भांडवलाची दिवसेंदिवस वाढ न होतां त्याचा साठाच कमी होत चालला आहे. पर्यायानें ज्या बचतीवर हें अवलंबून आहे तीही न वाढतां कमी कमी होत चालली आहे आणि बचत कमी कमी होत जाण्याचें कारण सध्यांची सर्व देशांतील वाढलेली कमाल करमर्यादा. जर लोकांजवळ जमलेला पैसा सरकारनें कर वाढवून काढून घेतला आणि राहिलेला दैनंदिन गरजांच्या वस्तूंच्या भरमसाट वाढलेल्या किंमतींनीं खाऊन टाकला तर ज्यांना नेहमींच विशेष बचत करणें शक्य आहे ते श्रीमंत लोक आणि सर्वसाधारण बचत करणारी मध्यमवर्गीय जनता यांच्याजवळ शिल्लक राहणार नाहीं. अर्थातच भांडवलवाढीला आणि त्यामुळें उत्पादनवाढीला ओहोटी लागल्याशिवाय राहणार नाहीं.

फे. ऑफ. ब्रि. इं. च्या मतें भांडवलाचा तुटवडा पडण्याचें मुख्य कारण उत्पादनखर्चांत बेसुमार वाढ हें होय. याचाच अर्थ चलनविस्तार. ज्यावेळेस किंमती चढतात त्यावेळेस झालेल्या जास्त नफ्यांतून कारखानदार मोठी गंगाजळी निर्माण करून स्वतःच्या वाढीस आवश्यक तेवढें भांडवल आपण होऊन जमवून ठेवूं शकतात व इतरांच्या तोंडाकडे पाहण्याची त्यांना गरज भासत नाहीं. पण जर सरकारनें त्याच वेळेस करांत बेसुमार वाढ केली तर कारखानदारांना अशा वेळीं गंगाजळी निर्माण करून ठेवणें अशक्य होईल. आणि सध्यां ब्रिटन काय, हिंदुस्थानांतहि हीच परिस्थिति आहे. तशांत सध्यां किंमतीवरील नियंत्रणें आणि मजुरींतील वाढ यांनीं कारखान्यांच्या नफ्याला विशेष कात्री लागल्याकारणानें कारखान्यांची वाढीच्या दृष्टीनें अनुकंपनीय स्थिति झालेली आहे. या दुर्दशेंतून मार्ग काढावयाचा असेल तर फेडरेशननें पुढील मार्ग सुचवले आहेत.

(१) १९४९-५० किंवा त्यापुढील सालाकरतां सरकारनें सर्व कारखान्यांना जरूरीप्रमाणें एक विशिष्ट रक्कम यंत्रादि पक्क्या मालाकरतां, नफा काढण्यापूर्वी वळती घालण्याची मुभा ठेवण्यांत यावी.

(२) यंत्रसामुग्रीची खरेदी आणि चालू कच्च्या मालाकरतां लागणारी रक्कम जमविणें सुकर व्हावें म्हणून जो नफा वाटून टाकण्यांत येणार नाहीं त्यावर कराची विशेष सूट यावी.

(३) योग्य नफा काढतांना पैशाची बदललेली क्रयशक्ति लक्षांत घेऊन नफा कसा आकारावा याबद्दल संशोधन.

फेडरेशनच्या वरील कैफियतींत सरकारनें वाढविलेल्या उद्योगधंद्यांवरील करांच्या ओझ्यावरच विशेष भर दिलेला आहे, हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

यानंतर चेस नॅशनल बँकेचे अध्यक्ष काय म्हणतात तें बघणें जरूर आहे. त्यांचेपुढें जरी अमेरिकेची परिस्थिति असली तरी त्यांनीं मांडलेले मुद्दे हिंदुस्थानालाही लागू पडतात. ते विशेष काळजीपूर्वक अभ्यासणें जरूर आहे.

श्री. आल्डरिच यांच्या मतें ( कॉमर्स, २२ जानेवारी १९४९, पान १३४ ) आर्थिक प्रगति भांडवल जमण्यावर अवलंबून असते व भांडवल जमवणें अथवा जमणें यांच्या पोटांत अनेक आर्थिक क्रिया-उपक्रिया समाविष्ट असतात. नवीन बचत पैशाच्या रूपानें करणें अथवा जमविलेल्या बचतीचा आहे तो उद्योग सांभाळून करणें अथवा वाढविणें, यंत्रादि पक्का माल व कच्चा माल घेणें याकडे उपयोग करणें हेंहि भांडवलाचेंच काम होय. तेव्हां भांडवल म्हणजे पैशा च्या दृष्टीनें खुद्द पैसाच व दुसऱ्या दृष्टीनें ' माल '. पैसा आणि भांडवल ही शेवटीं एकच होत. तेव्हां त्याची वाढ करणें हवें असेल तर जनतेला बचत करण्याकडे आकर्षित केलें पाहिजे आणि तें सरकारचें धोरण अनुकूल असण्यावर आणि नफ्यावरच्या विश्वासावर अवलंबून राहील. जर सरकारी कर म्हणजे जणू काय इस्टेटीची जप्तीच होऊं लागली, तर बचतीला निश्चित ओहोटी लागेल आणि जनता पैसा सांठून ठेवण्याऐवजीं तो उडवून टाकायला पाहील. जर सरकार अस्थिर असेल, बेपर्वा असेल अथवा उधळें असेल तरीहि बचत करण्याकडे प्रवृत्ति राहणार नाहीं. इकडे जर पैशाची क्रयशक्तीही खलास होत चालली तरीही बचतीला ओहोटी लागेल. सरते शेवटीं, जर पैसा ' स्वस्त ' करण्याकरतां, व्याजाचे दर कृत्रिम उपायांनीं खाली दाबून धरून बँकांनीं क्रेडिट वाढवलें तर पुन्हां एकदां बचतीला फांटा मिळून लोक पैसा साठविण्याऐवजी उडवून टाकतील.

आज अमेरिकेपेक्षां हिंदुस्थानला भांडवलाची अत्यंत उत्कटतेनें जरूर आहे आणि ती उणीव दूर करणें सरकारचें पहिलें कर्तव्य आहे. आल्डरिच यांच्या मतें मागील युद्ध चालूं होतें तेव्हां प्रथम लोकांची चांगल्या प्रकारें बचत करण्याकडे प्रवृत्ति होती. ती लढाई बंद झाल्यापासून कमी कमी होत चालली आहे. इतकेंच नव्हे तर लोक आतां अनेक कारणांनीं कर्जबाजारी होत चालले आहेत. तेव्हां जर उद्योगधंद्यांना जिवंत ठेवावयाचें असेल तर खालील मार्गांचा अवलंब आल्डरिच यांच्या मतें केला पाहिजे. (१) जो नफा कारखानदार वाटत नाहींत त्याच्यावरील कर एकदम कमी करण्यांत यावा. एक्सेस प्रॉफिट टॅक्स हा या दृष्टीनें गर्हणीय आहे. [ आपल्या इकडे एक्सेस प्रॉफिट टॅक्स जरी काढून टाकण्यांत आला असला तरी त्याचा भाऊ बिझिनेस प्रॉफिट अथवा कॅपिटल गेन्स टॅक्स बसविण्यांत आला आहे, तो निषेधार्ह आहे. ] देशाच्या ऐनजिनसी

उत्पन्नांत कराचा भाग फारच महत्त्वाचा आहे आणि आपण बसविलेल्या करांपासून उत्पन्न चांगलें मिळत असलें तरी त्याचे उद्योगधंद्यावर काय दुष्परिणाम होतात त्याकडे सरकारला दुर्लक्ष करून भागणार नाहीं. जो कायदा देशाला भांडवली जीवन न पुरवतां तें आटवून टाकतो तो कर-कायदा अश्लाघ्य होय. आमचे अर्थमंत्रि यांची दखल घेतील अशी आशा आहे. (२) ब्रिटिश फेडरेशनप्रमाणेंच आल्डरिच यांची दुसरी सूचना कारखानदारांना जास्त घसारा काढतां यावा याबद्दलचीच आहे. या ठिकाणीं आल्डरिच यांनीं अलीकडील काळांत पैशाच्या घसरत आलेल्या क्रयशक्तीकडे जास्त लक्ष पुरवून कारखानदारांना आपला घसारा काढून ठेवतां आला पाहिजे इतपतच कॉर्पोरेशन टॅक्स ठेवण्यांत आला पाहिजे याबद्दल विशेष आग्रह धरला आहे. तो सर्वस्वी उचित आहे यांत शंका नाहीं.

आल्डरिच यांनीं काढलेले कॅपिटल गेन्स टॅक्सबद्दल उद्गार तर आपल्याकडे फारच पूर्णतेनें लागू पडतात. कारण अमेरिकेची री ओढून लियाकत खान अर्थमंत्री असतांना त्यांनीं तो बसविला व आज अजून तो चालू आहे. तेव्हांपासून या करानें काय हाहा:कार मांडला आहे, तो सर्वांना दिसतच आहे. वास्तविक कॅपिटल गेन ही उत्पन्नाची बाब होऊं शकत नाहीं. कारण, तो प्रसंग एकादेवेळच येत असतो. कॅपिटल अथवा मुद्दलांत अचानक वाढ होते तशीच नुकसानही येतें, मुद्दल हें उत्पन्न नव्हे तर मुद्दल वापरण्यामुळें जें सालोसाल उत्पन्न येतें तें उत्पन्न. ब्रिटननें हेंच तत्त्व अबाधित धरून कॅपिटल गेन्सकडे अथवा मुद्दलांतील अचानक वाढीकडे दुर्लक्ष केलेलें आहे. यामुळें जोखमी उद्योगधंद्यांची निःसंशय वाढ होते आणि शेअर बाजारांतही उद्योगधंद्यांच्या शेअर्सना मोकळेपणा राहतो. आपल्याकडील बिझिनेस प्रॉफिट टॅक्स अत्यंत घातकी ठरला आहे. कारण, त्यानें मूळ दोन पैसे कमवण्याकरतां लागणारा उत्साह तोच त्यांत पार गाडून टाकला आहे.

भांडवल न जमण्याचें आणखी एक कारण युद्धोत्तर कालांत पैसा वाढला तो शेतकरी, कामकरी आणि अगदी मध्यमांतला मध्यम वर्ग त्याकडे जास्त गेला. या वर्गांना पैसा उद्योगधंद्यांत शेअर्सच्या रूपानें रोखण्याचे माहीत नाहीं, त्यामुळें युद्धोत्तर कालांत चांगल्या चांगल्या कंपन्यांनाही नवीन भांडवल उभारणें शक्य होत नाहीं, तेव्हां बहुतेक सर्वांना अलीकडे कर्जरोख्यांची कास धरावी लागत आहे. ताळेबंदी परिस्थिति कर्ज वाढल्याकारणानें बिघडत चालली आहे. जर उद्यां सर्वांगीण मंदी आली तर चांगल्या भक्कम कंपन्यांनासुद्धां कर्जफेडीपायी आपला यंत्रादि पक्का माल पडत्या भावांत विकून टाकणें प्राप्त होईल आणि बदलत्या आर्थिक काळाशीं जमवून घेणें त्यांना दुर्घट होईल.

आमचे अर्थमंत्रि वरील जिव्हाळ्याच्या विषयाकडे लक्ष पुरवून आपलें येत्या अंदाजपत्रकांत धोरण आखतील अशी आशा करणें वेडेपणाचें होईल काय ?

---

**रशिआनें आपला आर्थिक गट बनविला**—रशिया आणि पूर्व युरोपांतील कांहीं राष्ट्रें ह्यांनीं एकमेकास आर्थिक सहाय्य करण्याच्या हेतूनें एका कौन्सिलची स्थापना केली आहे. ह्या रशियन गटांत रशियाशिवाय, पोलंड, बल्गेरिआ, रुमानिआ, हंगेरी आणि झेकोस्लोव्हाकिआ हीं राष्ट्रें आहेत. ह्या राष्ट्रांनीं मार्शल मदत योजनेंत भाग घेण्याचें नाकारलेलें प्रसिद्धच आहे. ह्या सहा राष्ट्रांच्या आर्थिक कौन्सिलमध्यें कोणा इतर राष्ट्रांना सहभागी व्हावयाचें असल्यास तशी मुभा ठेवण्यांत आली आहे. सर्व राष्ट्रें मिळून जागतिक व्यापाराच्या क्षेत्राच्या ½ इतकीं भरतील.

**अंदमानांत वसाहत**—हिंदी संघराज्यांतून अंदमान बेटांत वसाहत करण्यासाठी २०० कुटुंबें पाठविण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. वसाहतवाल्यांची ही पहिली टोळी कलकत्त्याहून ९ फेब्रुवारीला निघणार आहे. त्यांत बहुतेक शेतकरी असले, तरी कांहीं कारागीर आणि सुतार इत्यादि व्यावसायिकहि आहेत. ह्या वसाहतवाल्यांच्या कुटुंबांना प्रवासाचा सरकारी खर्च, प्रत्येक कुटुंबाला १० एकर जमीन फुकट आणि दोन वर्षेपर्यंत जमिनीवरील सारा माफ अशा सवलती देण्यांत आल्या आहेत. त्याशिवाय कांहीं नक्त रकमा, इमारतीचें सामान, शेतीचीं अवजारें व जनावरें हींहि कांहीं काल पुरविण्यांत येणार आहेत.

**नारळांतून कापडाची चोरटी निर्यात**—पश्चिम बंगालमधून पूर्वबंगालमध्यें कापड चोरून पाठविण्याच्या कामीं नारळांचा उपयोग केल्याचें आढळून आलें आहे. मोठेसे नारळ घेऊन, त्यांचे दोन अर्धे भाग करून, आंत कापड भरून ते भाग पुन्हा बेमालूम जुळविण्यांत आले होते. पश्चिम बंगालच्या अधिकाऱ्यांनीं गेल्या महिन्यांत राणघाट ह्या सरहद्दीवरील स्टेशनवर संशयावरून ह्या नारळांच्या निर्यातीची तपासणी केली असता, वरील प्रकार उघडकीस आला. ह्याशिवाय, उशांतून नियंत्रित किंमतीच्या औषधांच्या गोळया धाडण्यांत आल्याचेंहि दिसून आलें आहे.

**मद्रास प्रांतांतील परकीयांचे उद्योगधंदे**—मद्रास विधिमंडळाच्या एका सभासदानें प्रांतांतील युरोपिअनांच्या मालकीच्या धंद्यांची यादी मागितली असता ती सहजासहजीं मिळणें कठीण असल्याचें सांगण्यांत आलें. त्याचप्रमाणें, प्रांतांतील युरोपिअन मालकीचे उद्योगधंदे विकत घेण्याचा सरकारचा सध्या तरी इरादा नाहीं, असेंहि उत्तर दुसऱ्या प्रश्नाला मद्रासच्या उद्योग-मंत्र्यांनीं दिलें.


उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

## ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादिसाठीं चौकशी करा:—

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५१९

---

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज् (ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)

(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन (ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु.)

(३) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन (ले:—आर. एम. तळपदे, किं. १२ आ.)

## उद्बोधक विचार

### कारखान्यांची चालविलेली लूट

"जुन्या यंत्रसामुग्रीच्या जागीं नवी बसविण्याचा प्रश्न फारच गंभीर स्वरूपाचा आहे. सरकार कारखान्यांच्या नफ्याचा जवळ जवळ निम्मा हिस्सा घेतें, परंतु स्वतः जबाबदारीचा हिस्सा मात्र उचलीत नाहीं. नवी यंत्रसामुग्री बसविण्यास आवश्यक तेवढी रक्कम बाजूस काढूं देत नाहीं. कारखान्यांची पुनर्घटना करण्याच्या किंवा चलनवाढीस आळा घालण्याच्या, कोणत्याच दृष्टीनें हें धोरण योग्य नाहीं. सरकारी अनिर्बंध खर्च चालू रहावे, ह्यासाठीं उद्योगधंदे लुटले जात आहेत; कारण अखेर उद्योगधंद्यांनाच ही नुकसानी भरून काढावी लागणार आहे. नवी यंत्रसामुग्री बसविणें व जुनी सुधारणें, ह्यावरच सर्व कांहीं अवलंबून आहे. परंतु त्यास आवश्यक तो संचय करण्यास उद्योगधंद्यांना वावच दिला जात नाहीं. सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या कोंबडीला मारण्याचा हा प्रकार आहे.":—इलेक्ट्रिक अँड म्युझिकल इंडस्ट्रीज लि. ( लंडन ) चे चेअरमन, सर अलेक्झँडर एकमन.

### अधिक धान्य पिकवा

नुकत्याच भरलेल्या दिल्ली येथील प्रांतिक आणि संस्थानी सरकारच्या मंत्र्यांच्या परिषदेंत अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेचा विचार करण्यांत आला. ह्या मोहिमेसाठी सुमारें २८२ कोटी रुपयांचा खर्च करण्यांत येणार असून, तींत ट्यूब वेल्स खोदणें, खतें निर्माण करणें आणि मच्छीमारीच्या धंद्याला उत्तेजन देणें ह्या बाबींचा समावेश करण्यांत आला आहे. ह्या २८२ कोटी पैकीं सुमारें ७१ कोटी रक्कम डॉलर्सच्या रूपानें सुमारें, ६४ कोटी पौंडांच्या रूपानें आणि उरलेले १४६ कोटी रुपये हिंदुस्थानांत उभे करावयाचे आहेत. प्रांतिक सरकारांनींच हे १४६ कोटी रुपये उभारावयाचे आहेत. तथापि त्यांना हें आजच शक्य नसल्यानें, मध्यवर्ती सरकार त्यांना तूर्त कर्ज देणार असून जादा उत्पन्न होणाऱ्या धान्याच्या विक्रींतून प्रांतिक सरकारांनीं त्याची फेड करावयाची आहे. परिषदेचे अध्यक्ष श्री. जयरामदास दौलतराम ह्यांनीं असें सांगितलें कीं, प्रांतांतील लोकांना अन्नधान्य पुरविण्याची जबाबदारी प्रांतांच्या सरकारांनींच घ्यावयास पाहिजे.

## दोन विशेषांक

### उद्यम आंबा विशेषांक

उद्यम मासिकाचा जानेवारी, १९४९ चा अंक आंबा विशेषांक म्हणून प्रसिद्ध झाला आहे. निरनिराळ्या विषयांची माहिती परिश्रमपूर्वक जमा करून विशेषांक काढण्यांत उद्यमच्या चालकांचा हातखंडा आहे. ह्या आंबा विशेषांकांत आंब्याची लागवड, कलमबांधणी, मशागत, त्याला लागणारें खत, पाणी, विविध जाती, वगैरे सर्व अंगांची भरपूर माहिती दिली असून आंब्यापासून तयार करण्याच्या विविध खाद्यपदार्थांच्या कृतीहि दिल्या आहेत. विशेष हा कीं, ह्या अंकांतील सचित्र चुटकेसुद्धां आंब्यासंबंधाचेच आहेत. एकंदरींत हा आंबा विशेषांक आकर्षक व बोधप्रद झाला आहे.

### आनंदाचा छंद अंक

आनंद ह्या मुलांच्या मासिकाचा जानेवारी, १९४९ चा अंक खास छंद अंक म्हणून काढण्यांत आलेला आहे. छंद अंक काढण्याची चालकांची ही कल्पना स्वागतार्ह आहे. फावला वेळ आनंदांत व सत्कारणीं घालविण्यासाठी विद्या, कला, हस्तव्यवसाय अथवा इतर अन्य आवडीचें काम स्वतःच्या हौसेसाठी करणें याला छंद असें म्हणतात. छंद म्हणजे केवळ खेळ नव्हे. छंदांमध्यें उपयुक्तता असते; ते निरर्थक नसतात. ह्या दृष्टीनें छंदांकडे लहानपणापासून बालवर्गाचें लक्ष वेधण्यास आनंदाच्या छंद अंकाचा चांगला उपयोग होईल. छंदांची आवड असणाऱ्या लोकांना 'छांदिष्ट' असें विशेषण ह्या अंकांत वापरलें आहे तें मात्र योग्य वाटत नाहीं. छांदिष्ट ह्या शब्दाचा मोलस्वर्थनें 'विलफुल, वेवर्ड' असा अर्थ दिलेला असून चांगल्या अर्थानें हा शब्द वापरण्याचा परिपाठहि नाहीं. तेव्हां 'छंदप्रेमी' असें कांहीं विशेषण वापरणेंच योग्य ठरेल.असो.एका चांगल्या विषयास ह्या अंकापासून आनंदाच्या चालकांनीं सुरवात केली आहे. व्यासंगपूर्वक व आस्थेनें छंदाबाबत बालवर्गास आनंदाकडून उत्तरोत्तर अधिक मार्गदर्शन मिळेल अशी अपेक्षा आहे.

— स. वा. दा.

| संस्थान | खेड्यांची संख्या | पतपेढ्या | लँड मॉर्गेज बँका | शेतकी बिगर क्रे. | अर्बन क्रे. सो. | बिगर शेती नॉ. क्रे. | कंझ्युमर्स सो. | हौसिंग सो. | बेटर फार्मिंग | बेटर लिव्हिंग | सेंट्रल बँका | तालुका बँका | सुपरवायझिंग यु. | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. सांगली | २४४ | १४५ | १ | ३ | १५ | १२ | २६ | २ | ... | ... | १ | २ | १ | २ | २१० |
| २. मिरज सी. | ६४ | २ | ... | १ | ... | ३ | २ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ८ |
| ३. मिरज ज्यू. | ३७ | ... | ... | ... | ... | १ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | १ |
| ४. वाडी | २ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ५. कुरुंदवाड सी. | ३९ | १ | ... | ... | ... | १ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | २ |
| ६. कुरुंदवाड ज्यू. | ३७ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ७. जत | ११९ | ४ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ४ |
| ८. जमखंडी | ९१ | २६ | ... | ३ | ५ | १३ | ४ | ... | ... | ... | १ | ... | ... | ... | ५२ |
| ९. मुधोळ | ८१ | २७ | ... | ... | २ | २ | १ | ... | ... | ... | १ | ... | ... | ... | ३३ |
| १०. सावंतवाडी | २२२ | १३ | ... | १ | १० | १ | १ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | २६ |
| ११. रामदुर्ग | ४० | १ | ... | ... | १ | २ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ४ |
| १२. अक्कलकोट | १०७ | ४ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ८ | १२ |
| १३. भोर | ५०२ | २ | ... | १ | २ | ३ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ८ |
| १४. फलटण | ७६ | ५५ | १ | ५ | ९ | २ | ३ | १ | ... | ... | १ | ... | ... | ... | ७७ |
| १५. औंध | ७२ | ७३ | ... | ... | १४ | ... | २ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ८९ |
| १६. सावनूर | २५ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| एकूण | १७५८ | ३५३ | २ | १४ | ५८ | ४० | ३९ | ३ | ... | ... | ४ | २ | १ | १० | ५२६ |

### मुंबई प्रांतांत विलीन झालेल्या संस्थानांतील सहकारी चळवळ

सांगली, मिरज, भोर, इत्यादि १६ संस्थानें मुंबई प्रांतांत विलीन झालीं, त्या सर्वांचें क्षेत्रफळ ७,२३२ चौ. मैल असून त्यांत १,७५८ खेडीं व २५ शहरें आहेत. विलीनीकरणाचे वेळीं त्या संस्थानांतील सहकारी चळवळीची परिस्थिति दर्शविणारा तक्ता खालीं दिला आहे, त्यावरून कांहीं संस्थानांत त्या चळवळीनें चांगली प्रगति केली होती असें दिसून येईल. परंतु कांहीं संस्थानांतून एकहि सहकारी सोसायटी नव्हती ! सांगली, फलटण, औंध, जमखिंडी व मुधोळ ह्या संस्थानांतच फक्त सहकारी चळवळीचा विशेष प्रसार झालेला होता, असें दिसतें. आतां मुंबई प्रांतांतच संस्थानी हद्द समाविष्ट झाली असल्यामुळें, प्रांतिक सहकारी खात्याकडे तेथील सहकारी चळवळीची पद्धतशीर प्रगति घडवून आणण्याचें काम आलें आहे.

## ब्रिटनमधील पुस्तक-प्रकाशनाचा धंदा

इंग्लंडमधील आर्थिक क्षेत्रांत इतर ठिकाणीं मंदी आलेली असो, अथवा नसो, पण पुस्तक प्रकाशनाच्या धंद्यावर तरी त्याची छाया पडलेली दिसत नाहीं. १९४८ च्या पहिल्या तीन महिन्यांत ह्या व्यवसायांत ७५ लाख पौंडावर उलाढाल झाली. अशीच प्रगति चालू राहिली तर १९४८ सालांत ३·५ कोटी पौंडांची उलाढाल होईल असा अंदाज आहे. १९३८ सालीं अवघी १·१ कोटी पौंडांची उलाढाल झाली होती. तथापि एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कल्पित कथा आणि सामान्य वाचकाला लागणारीं पुस्तकें ह्यांची मागणी मात्र पुस्तक-विक्रेत्यांकडून कमी होऊं लागली आहे. शालेय पुस्तकें, संदर्भग्रंथ, शब्दकोश ह्यांना मात्र भरपूर मागणी आहे. ह्या परिस्थितीमुळें कांहीं पुस्तकांच्या कंपन्या धंद्यांतून उठल्या आहेत आणि कांहीं त्याच वाटेवर आहेत. तेव्हां प्रकाशनाच्या धंद्यांत मंदी आलेली नाहीं हें उलाढालीचे आकडे पाहूनच काय तें खरें वाटेल.

इंग्लंडमध्यें ह्या धंद्यासंबंधी आशावाद बाळगणारी कांहीं मंडळी आहेत. त्यांचें म्हणणें असें कीं युद्धकालीन परिस्थितीमुळें जो नवीन वाचकवर्ग निर्माण झाला आहे तो पूर्वीप्रमाणेंच पुस्तकें विकत घेत राहील. हा आशावाद ठीक आहे. पण १९३० सालाच्या मंदींत ह्या धंद्यावर चांगलाच परिणाम झाला होता हें लक्षांत ठेवलें पाहिजे. १९३१ते१९३९ च्या दरम्यान२१प्रसिद्ध प्रकाशक-कंपन्या धंद्यांतून उठल्या. किती तरी होतकरू प्रकाशकांना आपल्यापेक्षा मोठ्या कंपन्यांत समाविष्ट व्हावें लागलें. २५ वर्षांपूर्वी इंग्लंड-मधील प्रकाशक-कंपन्यांचा असा अंदाज होता कीं सक्तीचें शिक्षण झाल्यामुळें नवीन पिढी विशेष वाचनप्रिय होईल आणि आपल्या धंद्याला भरभराटीचे दिवस येतील. पण त्यांची निराशा झाली. आपल्या अंदाजावर विसंबून प्रकाशक-कंपन्यांनीं भरमसाठ पुस्तकें प्रसिद्ध केलीं. न विकल्या जाणाऱ्या पुस्तकांनीं पुस्तकविक्रेत्यांचीं कपाटें भरून गेलीं. त्यांतच वृत्तपत्रांनीं डिकन्सच्या कादंबऱ्या व त्यासारखीं इतर पुस्तकें अतिशय सवलतीच्या दरानें आपल्या वाचकांना देण्यास प्रारंभ केला. अखेरचा टोला 'पेंग्विन' च्या प्रकाशनानें मिळाला. सर्व सामान्य माणसाची अशी खात्री झाली कीं ७॥ शिलिंग किंमतीच्या कादंबऱ्या, प्रवासवर्णनें अगर चरित्रें निष्कारण महाग असतात.

ह्या विलक्षण परिस्थितींतून पुस्तक-प्रकाशनाचा धंदा दोन गोष्टींमुळें वांचला. एक तर युद्धामुळें वाचकवर्ग कल्पनें बाहेर वाढला; त्यांतच २ कोटी पुस्तकें गुदामांतच जळून अगर इतर मार्गानें नाहींशीं झालीं. दुसरें कारण म्हणजे कागदाचा पुरवठा वाटपपद्धतीनें होऊं लागला. पुस्तकांच्या मागणीपेक्षा पुरवठा अधिक करणें प्रकाशकांना अशक्य झालें. १९४१ ते ४७ पर्यंत प्रकाशकांना जाहिरातींची आतषबाजी करतां आली नाहीं किंवा मागणीपेक्षा अधिक पुस्तकेंही छापता आलीं नाहींत. आतां परिस्थिति पुन्हा उलट दिशेनें जाऊं लागली आहे. १९४५ सालीं ६,७४७ पुस्तकें प्रसिद्ध झालीं; १९४७ सालीं १३,०४६ प्रसिद्ध झालीं. १९४८ सालांत त्यांची संख्या आणखी बरीच वाढेल. मागणीपेक्षा पुरवठा अधिक होण्याची भीति आजच उत्पन्न झाली आहे. शिवाय आज लोकांच्याजवळ पैसा आणि वेळ दोन्हीही कमी होत चालली आहेत. खेळ आणि करमणूक ह्यांच्या आकर्षणाची स्पर्धा पुस्तकांच्या विक्रीला जाणवूं लागली आहे. लहान मुलांचीं खेळणीं मिळूं लागल्यापासून त्यांच्याकरता लिहिलेल्या पुस्तकाचा खप कमी होऊं लागला आहे, ही गोष्ट सूचक नाहीं













काय ? धंद्यांतील ह्या जुन्या धोरणाबरोबरच कांहीं नवीनही धोके उत्पन्न झाले आहेत. दहा वर्षांपूर्वी एखादें पुस्तक छापण्यास जितका खर्च येत असे त्याच्या दुप्पट खर्च आज येतो. त्यामुळें पुस्तकांच्या किंमती वाढल्या खऱ्या पण त्याचा फायदा प्रकाशकाला पुरेसा मिळत नाहीं. पुस्तक-विक्रेत्याचें कमिशन व ग्रंथकाराचा मोबदला मिळून विक्रीच्या प्रत्येक शिलिंगांतील ६ पेन्स जातात. अखेर सर्व कांहीं पुस्तकांच्या विक्रीवर अवलंबून आहे. विक्री घटत चालली तर प्रकाशकांपुढें दोनच मार्ग शिल्लक उरतात. एक, पुस्तकांच्या किंमती वाढविणें किंवा नवीन पुस्तकें तोटा सोसून प्रसिद्ध करणें.

आणखी एक गंभीर संकट ब्रिटिश प्रकाशकांना भेडसावीत आहे. आतापर्यंत ज्या बाजारपेठेंतून फक्त ब्रिटिश प्रकाशकांचीं प्रकाशनें राखीव कुरण असल्यासारखीं येत असत, तेथें आतां अमेरिकन प्रकाशकांनीं प्रवेश केला आहे. कानडा आणि दक्षिण आफ्रिका ह्या देशांतून अमेरिकन प्रकाशकांच्या पुस्तकाचा लोंढाच आला आहे. ब्रिटिश प्रकाशक आपल्याकडून पाय रोवून उभे रहाण्याची खटपट करीत आहेत. पण अमेरिकन वाघाला रक्ताची चटक लागली आहे.

### टारिफ बोर्डाचा नवा समासद

हिंदी टारिफ बोर्डाकडे, संरक्षण मागणाऱ्या उद्योगधंद्यांचे अर्ज तपासण्याचें काम असें. आतां वेगवेगळया जिनसांच्या किंमतीबद्दल चौकशी करून सरकारास सल्ला देण्याचेंहि काम टारिफ बोर्डाकडे सोपविण्यांत आलेलें आहे. संरक्षित उद्योगधंद्यांच्या प्रगतीवरहि त्यालाच लक्ष ठेवावें लागतें. ह्या वाढलेल्या कामाचा उठाव व्हावा, ह्यासाठी टारिफ बोर्डाच्या सभासदांच्या संख्येंत एकाची भर घालण्यांत येत आहे. ह्या नव्या सभासदाचें नांव मि. एम. ई. रहमान असें आहे.

**मालमत्तेसाठी लग्न**—लॉस अँजेल्स येथें मिसेस निकोल्सन नांवाच्या एका अमेरिकन वृद्धेनें मि. ॲलन वुडस् नांवाच्या आपल्या मोटारड्रायव्हरबरोबर लग्न केलें. मिसेस् निकोल्सन ह्या ९० वर्षांच्या असून मि. वुडस् हा २८ वर्षांचा आहे. मि. वुडस् हा बाईकडे गेलीं ७ वर्षें आचारी व ड्रायव्हर म्हणून काम करीत आहे. मि. वुडस् हा फार सद्प्रवृत्त माणूस असल्यानें आपल्या मरणानंतर त्याला आपली मालमत्ता मिळावी असा मिसेस निकोल्सन ह्यांचा हेतू आहे. लग्नांत स्वर्गीय प्रेम इत्यादि भानगडी मुळींच नाहींत, असें बाईच स्वतः म्हणाल्या.

**हिंदुस्थान-अमेरिका व्यापार**—१९४९ सालीं हिंदुस्थान अमेरिकेकडून निर्यात मालाच्या किंमतीपेक्षा ( २५ कोटी डॉलर्स ) ७५ कोटी रुपयांची अधिक आयात करील असा अंदाज आहे. त्यामुळें हिंदुस्थानला इंटरनॅशनल मॉनिटरी फंडांतून अल्पमुदतीचीं डॉलर्सचीं कर्जें घ्यावीं लागतील. हिंदुस्थानला दरवर्षी फक्त १० कोटी डॉलर्सच ह्या फंडांतून घेता येतात. पण तेवढ्यानें काम भागण्यासारखें नाहीं. हिंदुस्थानच्या इंग्लंडकडील पौंडी येण्यांतून हिंदुस्थानला डॉलर्स मिळूं शकतील. तथापि, जुलै १९४८ ते जून १९४९ पर्यंत करारप्रमाणें अवघे ६ कोटी डॉलर्सच मिळूं शकतील. हिंदुस्थानांतून डॉलर्सच्या कक्षेंतील देशांना मुख्यतः ताग, अभ्रक, मँगेनीज, कच्चीं व कमावलेलीं कातडीं हा माल रवाना होतो. पण ह्याच्या निर्यातींतहि घट झाली आहे. कारण, कांहीं युरोपीय देश हा माल हिंदुस्थानांतून घेऊन तो अमेरिकेला थोडी कमी किंमत घेऊन पाठवीत आहेत. त्यांची ही धडपड डॉलर्स मिळविण्यासाठीच चालली आहे.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. वि. केळकर M. A., LL. B. (वकील) ( अध्यक्ष ) || श्री. बी. बी. वाळवेकर ( उपाध्यक्ष )

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

दी-
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापनाः १९२६.

मुख्य कचेरी :
सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. प. सावंत, जनरल मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ मांगुडा घ. नं. ९३५/१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व मोरेश्वर वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.